महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 3513
कोल्हापूर- ४१६ ००४
दिनांक- ११/११/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु.- मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत.**

**संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी. २ दिनांक २०/१२/२०१८**
**२) शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी. २ दिनांक २५/०१/२०१९**
**३) राज्यमंडळाचे पत्र जा.क्र. रा.मं./परीक्षा-७/६७११ दिनांक १२/१२/२०२२**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना या पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च २०२५ परीक्षेकरिता प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत प्रस्ताव मंडळ कार्यालयात सादर करण्यासाठी सूचना खालीलप्रमाणे आहे.

१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट क्रमांक १ ते ११ मध्ये (परिशिष्ट क्रमांक ६ व ७ वगळून) तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयातील सुधारित परिशिष्ट क्रमांक ६ व ७ मध्ये निर्गमित केलेल्या आहेत.

२) संबंधित माध्यमिक शाळेच्या शाळाप्रमुख/ मुख्याध्यापक यांनी परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचे परिपूर्ण क्रीडा प्रस्ताव विहित नमुन्यात **दिनांक ०१ जानेवारी २०२५ ते दिनांक ०५ एप्रिल २०२५ पर्यंत** जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे क्रिडा प्रस्ताव सादर करावेत व संबंधित जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन सदर क्रिडा प्रस्ताव संदर्भिय शासन निर्णयान्वये वाढीव गुण दर्शवुन शिफारसीसह विभागीय मंडळास **दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत** विना विलंब सादर करावेत.

३) एन.सी.सी. व स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचे प्रस्ताव **दिनांक ०१ मार्च २०२५ पर्यंत** संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये अनुज्ञेय होत असलेले वाढीव गुण दर्शवून स्पष्ट शिफारसीसह **दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत** विना विलंब प्रस्ताव मंडळास सादर करावेत.

४) इ. १० वी च्या एन.सी.सी. छात्र तसेच स्काऊट गाईड विद्यार्थ्यांसाठी, विविध स्तरावरील शिबीरे तसेच संचलनाचा कालावधी हा त्या त्या शैक्षणिक वर्षातील इ. १० वी च्या परीक्षेपूर्वीचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

५) इ. १० वी मध्ये शिकत असलेला खेळाडू विद्यार्थी हा एकापेक्षा अधिक खेळात / क्रिडा स्पर्धेत, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यात सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चत्तम असणा-या एकाच एकाच सहभाग / प्राविण्याचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील.

६) तसेच राज्यमंडळाच्या संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये खेळाडू, एन.सी.सी.,स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांचे छाननी शुल्क **प्रती विद्यार्थी रक्कम रु. २५/-** चलनाद्वारे बँकेमध्ये भरुन कार्यालयाची मूळ प्रत प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**७) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली मुदतबाह्य प्रस्ताव कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत. याबाबत संबंधित मुख्याध्यापक यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१) शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा / सांगली /कोल्हापूर
२) जिल्हा क्रिडा अधिकारी, सातारा / सांगली / कोल्हापूर